# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:01.12.2025** **वार:सोमवार**

1. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणं आपल्या सर्वांचं कर्तव्य असल्याचं पंतप्रधानांचं मन की बातमधून प्रतिपादन
2. संसदेचं आजपासून हिवाळी अधिवेशन
3. राज्यातल्या विविध नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रचार शिगेला
4. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पन्नास षटकांच्या पहिल्या सामन्यात भारताचा 17 धावांनी विजय आणि
5. राज्यात पुन्हा थंडीचा जोर

**<u>मन की बात</u>**

नैसर्गिक शेती हा भारतीय परंपरेचा भाग असून आपल्या धरणी मातेचं संरक्षण करण्यासाठी नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणं हे आपल्या सर्वांचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. आकाशवाणी वरील मन की बात या कार्यक्रमातून काल त्यांनी देशवासीयांशी संवाद साधला. कृषी क्षेत्रात देश प्रगती करत असून देशात विक्रमी म्हणजे 357 दशलक्ष टन अन्नधान्याचं उत्पादन झाल्याचं पंतप्रधान म्हणाले. मध उत्पादन आणि मध निर्यातीच्या क्षेत्रात देशानं केलेल्या प्रगतीबाबत बोलताना ते म्हणाले....

**आज भारत honey production में नए रिकार्ड बना रहा है | 11 साल पहले देश में honey का उत्पादन 76 हजार मीट्रिक टन था | अब ये बढ़कर डेढ़ लाख मीट्रिक टन से भी ज्यादा हो गया है | बीते कुछ वर्षों में शहद का export भी तीन गुना से ज्यादा बढ़ गया है | Honey Mission कार्यक्रम के तहत खादी ग्रामोद्योग ने भी सवा 2 लाख से ज्यादा bee-boxes लोगों में बांटे हैं | इससे हजारों लोगों को रोजगार के नए अवसर मिले हैं | शहद की मिठास भी बढ़ रही है | और ये मिठास किसानों की आय भी बढ़ा रही है |**

अंतराळ आणि क्रीडा क्षेत्रात देशानं केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. मंगळ ग्रहासारख्या वातावरणात जीपीएस प्रणालीशिवाय ड्रोन उडवण्याची स्पर्धा इस्त्रोनं आयोजित केली होती, त्याची चित्रफित पाहिल्याचा अनुभव सांगत; पुण्यातल्या एका संघानं यात यश मिळवल्याचा उल्लेख त्यांनी केला. भारतीय खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला.....

**कुछ दिन पहले ही तोक्यो में डेफ–ओलिम्पिक्स हुए हैं, जहाँ भारत ने अपना अब तक का सर्वश्रेष्ठ प्रदर्शन करते हुए 20 मेडल जीते हैं। हमारी महिला खिलाड़ियों ने भी कबड्डी वर्ल्ड कप जीतकर इतिहास ही रच दिया। वर्ल्ड बोक्सिंग कप फाइनल्स में भी हमारे खिलाड़ियों का प्रदर्शन शानदार रहा, जहां उन्होंने 20 मेडल्स जीते। जिस बात की और भी अधिक चर्चा हो रही है, वो है हमारी महिला टीम का ब्लाइंड क्रिकेट वर्ल्ड कप जीतना। बड़ी बात यह है कि हमारी इस टीम ने बिना एक भी मैच हारे, इस टूर्नामेंट को जीता है। सबसे बड़ी जीतों में से एक है, जो हर भारतीय को प्रेरित करती रहेगी।**

संविधान दिन, वंदे मातरम् या गीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल देशभरात होत असलेले कार्यक्रम, अयोध्येत राम मंदिरावर धर्मध्वजारोहण, कुरुक्षेत्रातल्या पांचजन्य स्मारकाचं लोकार्पण अशा विविध सांस्कृतिक घडामोडींचा त्यांनी आढावा घेतला. राष्ट्रीय संग्रहालयातले भगवान बुद्धांचे पवित्र अवशेषांचं भूतान, रशियासह, मंगोलिया, व्हिएतनाम आणि थायलंड अशा

अनेक देशांमध्ये प्रदर्शित केले जात असल्याचा उल्लेख त्यांनी केला. आगामी ख्रिसमस आणि नवीन वर्षाची खरेदी करताना वोकल फॉर लोकलचा मंत्र अनुसरत स्थानिक कलाकारांनी बनवलेल्या वस्तूंची खरेदी करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**अधिवेशन**

संसदेचं हिवाळी अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. या अधिवेशनाचा कालावधी येत्या 19 डिसेंबरपर्यंत निश्चित करण्यात आला आहे. या अधिवेशनात मतदार याद्यांचं सखोल पुनरिक्षण, दिल्ली बॉम्बस्फोट अशा विविध मुद्द्यावरून विरोधी पक्ष प्रश्न उपस्थित करतील अशी शक्यता आहे. अधिवेशनात अनेक नवीन विधेयकंही आणली जाणार आहेत, या पार्श्वभूमीवर संसदेचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सर्व पक्षांना सहकार्याचं आवाहन करण्यासाठी केंद्र सरकारनं काल सर्वपक्षीय बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. राज्यसभेतले सभागृह नेते जे पी नड्डा, संसदीय कार्य मंत्री किरेन रिजिजू आणि राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल आणि एल मुरुगन हे देखील या बैठकीला उपस्थित होते. काँग्रेसचे गौरव गोगोई, शिवसेनेचे नरेश म्हस्के, यांच्यासह अनेक नेते या बैठकीत सहभागी झाले होते.

**मुख्यसचिव**

राज्याचे मुख्यसचिव म्हणून राजेश अग्रवाल यांनी काल कार्यभार स्वीकारला. ते भारतीय प्रशासकीय सेवेच्या 1989 च्या महाराष्ट्र तुकडीचे अधिकारी आहेत.

**नॅशनल हेराल्ड**

नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या विरोधात दिल्ली पोलिसांनी प्राथमिक माहिती अहवाल दाखल केला आहे. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात सक्तवसुली संचालनालयानं केलेल्या तक्रारीवरुन दिल्ली पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेनं हा अहवाल नोंदवला आहे. काँग्रेसचे अन्य नेते सुमन दुबे, सॅम पित्रोदा यांच्यासह एकंदर 9 जणांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई खोडसाळपणाची असून केवळ काँग्रेस नेत्यांना अडचणीत आणण्यासाठी केली जात असल्याची टीका पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी केली आहे.

**एनडीए**

सध्या तंत्रज्ञानात वेगानं बदल होत असून या बदलत्या जगाला सामोरं जाण्यासाठी आत्मविश्वास, धैर्य आणि शिस्त हे सद्गुण उपयोगी पडणार आहेत, असं प्रतिपादन नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी काल पुण्यात राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 149 व्या तुकडीच्या दीक्षांत संचलन सोहळ्यात केलं. प्रबोधिनीच्या खेत्रपाल मैदानावर झालेल्या या संचलन सोहळ्यात 1250 छात्र सहभागी झाले होते. छात्र सिद्धार्थ सिंग यानं संचलनाचं नेतृत्त्व केलं. राष्ट्रपती सुवर्ण पदक दीपक कांडपाल, रौप्य पदक सिद्धार्थ सिंग आणि कास्य पदक सिद्धी जैन यांना प्रदान करण्यात आलं. यावेळी प्रबोधिनीचे कमांडंट व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी उपस्थित होते. दीक्षांत संचलन सोहळ्याच्या निमित्तानं ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या माजी एनडीए अधिकाऱ्यांच्या स्मृती स्थळाला भेट देऊन श्रद्धांजली वाहिली.

**निवडणूक**

राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतिम टप्प्यात काल राज्यभरात सर्वपक्षीय नेत्यांनी जोमानं प्रचार केला. सांगली जिल्ह्यातल्या उरण ईश्वरपूर इथं नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा झाली. उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी काल सिंधुदुर्गात जाहीर प्रचारसभा घेतल्या. मालवण, वेंगुर्ला आणि सावंतवाडी नगरपरिषदेच्या निवडणुकांच्या प्रचारासाठी ते सिंधुदुर्गात आले होते.

**निवडणुका स्थगित**

दरम्यान, न्यायालयीन अपील दाखल झालेल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगानं जाहीर केला आहे. त्यानुसार 4 डिसेंबरला निवडणूक कार्यक्रम जाहीर

होणार असून, 10 डिसेंबरला दुपारी 3 वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. आवश्यकता असल्यास 20 डिसेंबरला मतदान होईल आणि21 डिसेंबरला निकाल जाहीर करण्यात येईल.

**नदी स्वच्छता**

नदी स्वच्छता हा केवळ एक उपक्रम नाही तर पुणेकर नागरिकांसाठी महापालिकेच्या माध्यमातून तयार झालेलं स्वच्छतेचं व्यासपीठ आहे असं मत पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी काल व्यक्त केलं. पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा आणि पर्यावरण विभागातर्फे नदी महोत्सव- स्वच्छ नदी, सुंदर पुणे या उपक्रमांतर्गत शहरातील नद्यांची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली त्यावेळी आयुक्त बोलत होते. या मोहिमेत विविध महाविद्यालयं, नागरिक, स्वयंसेवी संस्था, कंपन्या आणि महापालिकेच्या विभागांनी सहभाग नोंदवला. या मोहिमेतून 11 टनांपेक्षा अधिक कचरा गोळा करण्यात आला.

**एड्सदिन-WHO**

एड्सला विषयी जनजागृती करण्याच्या उद्देशानं 1 डिसेंबर हा दिवस जगभरात एड्स दिन म्हणून पाळला जातो. या निमित्तानं आज देशभरात विविध जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या प्रमुख उपस्थितीत आज दिल्लीतल्या विज्ञान भवनात जागतिक एड्स दिनाच्या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**सेवा निवृत्ती**

आकाशवाणी पुणे केंद्रातील अभियांत्रिकी सहाय्यक प्रसाद कराडकर, तंत्रज्ञ अनिल दोडके आणि लिपिक दीपक शिर्के 35 वर्षांच्या सेवेनंतर काल सेवानिवृत्त झाले. प्रसाद कराडकर यांनी अभियांत्रिकी कर्मचारी संघटनेच्या विविध पदांवरही काम केलं होतं.

**खेलो इंडिया**

राजस्थानमध्ये सुरु असलेल्या विद्यापीठ स्तरावरील पाचव्या खेलो इंडिया स्पर्धेत कालचा दिवस महाराष्ट्राच्या सायकलपटूंनी गाजवला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिद्धी शिर्के आणि मंगेश ताकमोगे यांनी पाच फेऱ्यांच्या एलीट शर्यतीत सुवर्णपदक पटकावलं. तर वीस किलोमीटर शर्यतीमध्ये कोल्हापूरच्या सिद्धेश पाटीलला सुवर्णपदकानं अवघ्या एका गुणानं हुलकावणी दिली. कोल्हापूर विद्यापीठाच्या सायली आरंडेनं सायकलिंग ट्रॅक स्पर्धेत दोन कास्य पदकं मिळवली. महिलांच्या स्क्रॅच प्रकारात पुणे विद्यापीठाकडून खेळताना आदिती डोंगरेनं रौप्य पदक मिळवलं.

**क्रिकेट**

पन्नास षटकांच्या क्रिकेट मालिकेत तीनपैकी पहिल्या सामन्यात, रांची इथं भारतानं दक्षिण आफ्रिकेचा काल 17 धावांनी पराभव केला. 50 षटकांत 350 धावांचं लक्ष्य गाठताना, 4 चेंडू शिल्लक असताना दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ 332 धावांवर बाद झाला. तत्पूर्वी विराट कोहलीच्या 135 धावांच्या जोरावर भारतानं 50 षटकांत 8 बाद 349 धावा केल्या. कोहलीनं पन्नास षटकांच्या सामन्यातील त्याचं 52 वं आंतरराष्ट्रीय शतक नोंदवून एकाच स्वरूपाच्या सामन्यांमध्ये सर्वाधिक शतकांचा नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला. तर, रोहित शर्मानं पन्नास षटकांच्या सामन्यांमध्ये सर्वाधिक 352 षटकार पूर्ण करुन यापूर्वी शाहिद आफ्रिदीचा विक्रम मोडला.

**हवामान**

राज्यात अनेक ठिकाणी पारा दहा अंशांच्या खाली घसरला आहे. थंडीची ही लाट पुढील दोन दिवस राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.